# <u>प्रेसनोट</u>

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १६.०८.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | आरोपी श्री.प्रतिष बबनराव लोखंडे,वय–४२ वर्ष,धंदा–मजुरी,रा.घर क्र. २६४,प्रबुध्द मंडळ,फ्रेजरपुरा,अमरावती (खाजगी व्यक्ती) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १८/०७/२०२५ चे १६/१० ते १६/४८ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | २०,०००/– रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | १५,०००/– रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १७/०७/२०२५ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांनी मौजे तारखेडा प्रगणे–बडनेरा ता.जि.अमरावती येथील दोन प्लॉटचा नोटरी करून सौदा करून दिला होता सदरचे दोन प्लॉट हे भुखंड असल्याने सदर प्लॉटची व्यवहार व फेरफार होत नाही करीता दोन्ही प्लॉटचे अमरावती महानगरपालीका येथुन त्रिवेणी योजनेमार्फत अमरावती तहसील कार्यालयाकडुन मंजुर/अधीकृत परवाना तयार करून घेण्याचे काम तक्रारदार यांना त्या कामाची माहीती असल्यामुळे मुळ मालकांनी नोटरी करून लेखी अधिकारपत्रासह तक्रारदार यांना दिले होते.सदरचा व्यवहार हा दोन भुखंडाचा असल्याने त्याची विक्री करण्यासाठी सदर भुखंड प्रकरण त्यांनी महानगरपालीका येथे दाखल केले होते त्यांनंतर ते मंजुरीसाठी तहसील कार्यालय,अमरावती येथे आले होते.सदरचे प्रकरणात भुखंड विक्री परवाना लवकर तयार करून देणेसाठी तहसिल कार्यालय व परिसरात कामकरणारा खाजगी व्यक्ती श्री.प्रतिष बबनराव लोखंडे यांनी २०,०००/– रू. लाचेची मागणी केली होती. दि. १८/०७/२०२५ रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष आरोपी (खाजगी व्यक्ती) श्री.प्रतिष बबनराव लोखंडे यांनी तडजोडीअंती १५,०००/– रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनतर दि. २१/०७/२०२५ रोजी दि.३०/०७/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक श्री. लोखंडे यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम घेण्याचे टाळाटाळ करीत लाच रक्कम स्विकारली नाही. वरून त्यांच्या विरूध्द गाडगे नगर पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी पो.नि.ज्ञानोबा फड, पोलीस अंमलदार वैभव जायले, विनोद धुळे, युवराज राठोड यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क:** १) मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र अम.
मो.क्र.९८५०४८८७८८
२) श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,अम.
मो.क्र.९७६४२१०४८५
३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
मो.क्र.९८२३१११९५५
अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.७५१७५७१०६४, टोल फ्रि नंबर–१०६४.

पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती सत्यमेव जयते

( ज्ञानोबा फड )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.